14 MAR 2017 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नव्या विद्यापीठ कायद्यातील पदनियुक्तीबाबत हालचाली

## राज्यपालांची लागते मंजुरी; बीसीयूडी पद रद्द

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

नव्या विद्यापीठ कायद्यानुसार नवीन पदांच्या नियुक्तीची प्रक्रिया शिवाजी विद्यापीठ प्रशासनाकडून सुरू आहे. चार अधिष्ठाता आदींसह काही विभागांत संचालक नियुक्त करावे लागणार आहेत. यासाठी राज्यपालांची मंजुरी लागते. त्यामुळे याबाबतचे प्रस्ताव तयार करण्याचे काम सुरू आहे. विद्यापीठातून बीसीयूडी हे पद आता रद्द झाले आहे.

१ मार्चपासून नव्या विद्यापीठ कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली. या कायद्यानुसार नवीन पदांची नियक्ती करावी लागणार आहे. विविध विभागांत अधिष्ठातांसह काही विभागांत संचालक नियुक्त करावे लागणार आहेत. नवा कायदा हा विद्यार्थीकेंद्रित असल्याने सर्वच स्तरावर विद्यार्थ्यांचे प्रतिनिधित्व असणार आहे. मात्र, प्रत्येक पदाच्या नियुक्तीला राज्यपालांची मंजुरी लागणार असल्याने याबाबत प्रस्ताव तयार केले जात असल्याचे समजते. याबाबत कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर म्हणाले, नव्या कायद्यानुसार असणाऱ्या पदांच्या पात्रतेचे निकष या आठवड्यात सरकारकडून प्राप्त होतील, अशी अपेक्षा आहे. निकष प्राप्त झाल्यानंतर पदांच्या नियुक्तीची कार्यवाही सुरू होईल.

जनसंपर्क कक्ष
14 MAR 2017 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## डॉ. आनंद पाटील यांच्या पुस्तकाचे आज प्रकाशन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण अध्यासन केंद्र व आनंद ग्रंथसागर प्रकाशनतर्फे गोवा विद्यापीठाच्या इंग्रजी विभागाचे माजी प्रमुख प्रा. डॉ. आनंद पाटील लिखित 'ग्रंथांनी रचलेला महापुरुष : यशवंतराव चव्हाण' पुस्तकाचे उद्या (ता. १४) प्रकाशन होत आहे. राजर्षी शाहू सभागृहात दुपारी चार वाजता कार्यक्रमास सुरवात होईल. ज्येष्ठ पत्रकार विजय कुवळेकर हे प्रमुख वक्ते आहेत. माजी राज्यपाल डॉ. डी. वाय. पाटील अध्यक्षस्थानी असून कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे उपस्थित राहतील.

जनसंपर्क कक्ष
14 MAR 2017 शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
तरुण भारत

■ **प्रकाशन :** शिवाजी विद्यापीठातील यशवंतराव चव्हाण अध्यासन केंद्र आणि आनंद ग्रंथसागर प्रकाशन यांच्यातर्फे 'ग्रंथांनी रचलेला महापुरुष : यशवंतराव चव्हाण" या पुस्तकाचे प्रकाशन. स्थळ : शाहू सिनेट हॉल, शिवाजी विद्यापीठ. वेळ : ४ वाजता

14 MAR 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी



# विद्यापीठात नव्या पदांची तात्पुरती नियुक्ती

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

नव्या विद्यापीठ कायद्यानुसार ज्या पदांची निर्मिती करावयाची आहे, अशा पदांची तात्पुरती नियुक्ती ३१ ऑगस्टपर्यंत केली जाणार असल्याची माहिती शिवाजी विद्यापीठ प्रशासनाकडून देण्यात आली.

याबाबत मार्गदर्शक प्रणाली प्राप्त झाल्यानंतर तत्काळ कार्यवाही सुरू केली जाणार आहे. १ मार्चपासून नवा विद्यापीठ कायदा लागू झाल्यामुळे प्रशासकीयस्तरावर सोयीसाठी तात्पुरती नियुक्ती केली जाणार आहे. सध्या या कायद्याच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने वरिष्ठस्तरावर बैठका सुरू असून, नियोजन सुरू आहेत.

14 MAR 2017 महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यशवंतराव : ग्रंथांनी रचलेला महापुरुष



डॉ. आनंद पाटील यांच्या 'ग्रंथांनी रचलेला महापुरूष : यशवंतराव चव्हाण' या ग्रंथाच्या सुधारित दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन माजी राज्यपाल डॉ. डी. वाय. पाटील यांच्या हस्ते आज (मंगळवारी) शिवाजी विद्यापीठात सायंकाळी ४ वाजता होत आहे. त्या निमित्त **डॉ. आनंद पाटील** यांच्याशी संवाद...

**■ प्रश्न : आपल्या 'ग्रंथांनी रचलेला महापुरुष: यशवंतराव चव्हाण' या ग्रंथाची दुसरी आवृत्ती प्रसिध्द होत आहे. वाङ्.मयीन चरित्र या नव्या प्रकाराची कल्पना कशी सुचली? त्याच्या शीर्षकात 'रचलेला' हा शब्द का वापरला आहे तसेच ते आजवरच्या चरित्रांपेक्षा वेगळे कसे आहे?**

**पाटील** : मी कराडमध्ये चव्हाणसाहेबांच्यावर 'यशवंतराव चव्हाण आणि विश्वसाहित्य' या विषयावर व्याख्यान द्यायला गेलो होतो. त्यावेळी यशवंतरावांनी जगभरातून विकत घेतलेले सात हजार इंग्रजी ग्रंथ आणि दीड डझन विश्वकोष पहावयास मिळाले. असंख्य नियतकालिके संग्रही ठेवली आहेत. याच काळात एस. एस. प्रॉवर यांच्या 'कार्ल मार्क्स अँन्ड वर्ल्ड लिटरेचर' या ग्रंथावर मी लेख लिहिला होता. त्यामुळे ग्रंथाधाराचा संबंध त्यांच्या जीवन व कार्याशी जोडण्याचा विचार सुचला. त्यांच्या मराठी ग्रंथ व कलांचा जाणकार रसिक हे मिथक बऱ्याच प्रमाणात सांस्कृतिक मॅच फिक्सिंगच्या राजकारणातून तयार झाल्याचे लक्षात आले. कारण त्यात विश्व साहित्यातील हजारो ग्रंथाचा उल्लेख फारसा आढळत नाही.

**■ यशवंतराव चव्हाण यांचे अफाट वाचन ही दंतकथाच बनली, पण त्यांच्यावरील परदेशी इंग्रजी ग्रंथांचे उल्लेख फारसे नाहीत. शिवाय ते साहित्य संगीत, नाट्य वगैरेचे अभिजात रसिक हेच गारूड मराठी मनावर कायमचे बसल्याचे दिसते. ते आजवर कायम कसे टिकले?**

- त्यांच्या बेरजेच्या राजकारणात सोयीसाठी ते स्वीकारलेले दिसते.




जनमानसांच्या मनाची स्पंदने समजून घेण्यासाठी लोककला, नाटक, संगीत व समकालीन साहित्याचा उपयोग त्यांनी कसा केला याचा आलेख त्यांनी 'कृष्णाकाठ' मध्ये रेखाटला आहे.

**■ मग साहित्याशिवाय अन्य विषयांच्या कोणत्या इंग्रजी ग्रंथाकडे ते कसे व का वळले?**

- ग्रंथांच्या आधारे 'रचण्याचा' हा प्रयत्न त्यांनी जाणीवपूर्वक केला. 'रचलेला' हा फ्रेंच विव्दानांनी मांडलेल्या 'रचनावादा' (स्ट्रक्चरॅलिझम) मधून घेतला आहे. तो 'घडवलेला' या परावलंबी पोकळ शब्दापेक्षा सधन आहे. आचार्य भागवतांसारख्या विव्दान स्वातंत्र्य सैनिकांनी तुरुंगात इंग्रजी व संस्कृत ग्रंथांचे वाचन व चर्चा केल्या. हे विल्यम शेक्सपिअरच्या 'ज्युलियस सीझर' या नाटकाचा यशवंतरावांच्या मृत्यूपत्रावर झालेला प्रभाव तपासल्यास लक्षात येईल. संस्कृत शिकवायला नकार मिळाला, तेव्हा 'मेघदूत' हे संस्कृत नाटक पाठ करणारा हा ज्ञानपिपासू जिद्दी तरुण होता. ते इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व कायद्याचे विद्यार्थी होते. मी त्यांनी वाचलेल्या विश्वसाहित्याचे दहा वर्षात कसे वाचन केले हे तपासू लागलो. पहिला रूढ चरित्राचा खर्डा अपूर्ण वाटू लागला. याच काळात दिवंगत अरूण टिकेकरांनी मला रिचर्ड राईटने वीस वर्षे राबून लिहिलेले 'हाऊ रिडिंग शेप्ड द लाईफ अँण्ड वर्क्स ऑफ ऑस्कर वाईल्ड' हा ग्रंथ पाठवला आणि समग्र हस्तलिखित मी बदलले.

**■ या वाचनाचा परिणाम त्यांच्या जीवन व कार्यावर नेमका कसा झाला?**

मी ते सप्रमाण सिध्द केले आहे. विधानसभा व लोकसभेतील त्यांची भाषणे, मुंबईत आमदार म्हणून जाताच इंग्रजीतच बोलण्याची प्रतिज्ञा करणे, स्वत:ची 'देशी' इंग्रजी वक्तृत्व शैली तयार करण्याची जिद्द बाळगणे असे अनेक मुद्दे मी सविस्तर मांडले आहेत. चीनवरील शे दीडशे ग्रंथ त्यांनी संरक्षण मंत्री होताच विकत घेतले. चीनमधील पीत नदीवरच्या धरणाचा मोठा अहवाल वाचून ते कोयनसारख्या धरण योजनाकडे वळले. ज्या खात्याचे ते मंत्री झाले त्या विषयावरील शेकडो पुस्तके त्यांनी विकत घेतली. उदाहरणार्थ 'भारताचे परराष्ट्र धोरण' हे इंग्रजी पुस्तक त्यांनी लिहिले त्या काळात मराठीत या विषयावर फारशी पुस्तके नव्हती. विशेषत: परप्रांतीयांनी त्यांच्याविषयी इंग्रजीत केलेले लेखन महाराष्ट्राला माहित नाही. म्हणूनच मी 'महाराष्ट्राला माहित नसलेले यशवंतराव चव्हाण' हा लेख लिहिला होता.

● प्रतिनिधी

14 MAR 2017
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# 'ग्रंथांनी रचलेला महापुरुष' : पुस्तकाचे आज प्रकाशन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील यशवंतराव चव्हाण अध्यासन केंद्र आणि आनंद ग्रंथसागर प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त डॉ. आनंद पाटील लिखित 'ग्रंथांनी रचलेला महापुरूष : यशवंतराव चव्हाण' या पुस्तकाचे प्रकाशन मंगळवार १४ मार्च रोजी सायंकाळी ४ वाजता होणार आहे. शिवाजी विद्यापीठातील सिनेट हॉलमध्ये होणाऱ्या या पुस्तक प्रकाशन सोहळ्याला माजी राज्यपाल डॉ. डी. वाय. पाटील प्रमुख उपस्थिती दर्शवणार आहेत. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. तसेच ज्येष्ठ पत्रकार विजय कुवळेकर यांचे व्याख्यान होणार आहे. तरी जास्तीत जास्त लोकांनी या पुस्तक प्रकाशन सोहळ्यास उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर व यशवंतराव चव्हाण अध्यासनाचे प्रमुख डॉ. ए. एम. गुरव यांनी केले आहे.



**शिवाजी विद्यापीठ येथे कार्यक्रमाचे आयोजन**